# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-6465145/46 **कार्यासन दु. क्र.** 0712-6465145

**E-mail :** ronagpur@dtemaharashtra.gov.in **Website:** rdtenagpur.org.in

**परिपत्रक**

**क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/परिपत्रक/2017/** 3133

**दिनांक:-** 14 NOV 2017

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर जिल्हा, नागपूर.

विषय:- अपघातमुक्त नागपूर बनविण्याकरीता जनजागृती करण्याकरीता शाळा व महाविद्यालयांचा सहभाग मिळण्याबाबत.

संदर्भ:- अपघातमुक्त नागपूर समिती, नागपूर यांचे दि. 3/11/2017 रोजीचे पत्र

नागपूर शहराची विकासाची घोडदौड व Smart City च्या दृष्टीने प्रगती ही आपणाकरीता अतिशय अभिमानाची बाबआहे. त्याचबरोबर मानवी चुकांमुळे होणारे अपघात व त्यामुळे होणारे कौटुंबीक अपघात ही अत्यंत दु:खद बाब आहे.

त्याकरीता नागपूर महानगर पालिका व अपघातमुक्त नागपूर समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने जानेवारी 2018 मध्ये रस्ता सुरक्षा पंधरवाडयाचे यशवंत स्टेडीयम, नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे.

सदर रस्ता सुरक्षा पंधरवाडयात आपल्या संस्थेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या चळवळीत सहभागी होण्याकरीता व सहभाग घेण्याकरीता प्रोत्साहीत करावे.

**सहपत्र:**- संदर्भिय पत्र

सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

प्रत:- अपघातमुक्त नागपूर समिती, 96-डी, रामनगर, सर्वेश्वर मंदीर समोर, नागपूर-440033 यांना माहितीकरीता.

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

युवा दौड मंच रजि.नं. F22483

# अपघातमुक्त नागपूर समिति

कार्यालय : ९६-डी, रामनगर, सर्वेश्वर मंदीर समोर, नागपूर-४४००३३
Email : accfn2018@gmail.com, Web.: www.roadsafetyjsp.org

| सौ. नंदाताई जिचकार<br>मा. महापौर<br>अध्यक्ष | श्री. राजु वाघ<br>कार्याध्यक्ष,<br>मो. ९०९६६५९७९२ | श्री. अजय डबीर<br>महासचिव,<br>मो. ८९५६९९९९९० |
|---|---|---|


## संस्थेचे कार्य

**भाग १**

- रस्ते अपघातग्रस्तांना मदत करणे. अपघाग्रस्तांचा जीव वाचविणे
- गरजु अपघातग्रस्तांसाठी रक्तदान
- ॲम्बुलन्स : प्रथमोपचार प्रशिक्षण वाहन व रस्ता सुरक्षा चालते-फिरते अनुसंधान
- प्रथमोपचार बॉक्स वाटप
- अपघातग्रस्त रक्षक शाखा तयार करणे
- स्व. मोहन जावडेकर स्मृती विदर्भस्तरीय रस्ते अपघातग्रस्त रक्षक पुरस्कार समारंभ

**भाग २**

- रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान वर्षभर राबविणे

**जीवन सुरक्षा आपल्या दारी**

- अपघातमुक्त व्यक्ती
- अपघातमुक्त परिवार
- अपघातमुक्त परिसर

- संकल्प : अपघातमुक्त नागपूर अपघातमुक्त नागपूरचे मॉडेल
- माझे नागपूर, अपघातमुक्त नागपूर पोर्टल पब्लिक कम्प्लेंट बॉक्स
- लोकसहभागातुन रस्त अपघात मुक्ती उपाय योजना व अनुसंधान केंद्र
- स्व. इंदिरा वाघ स्मृती, रस्ते अपघातमुक्त नागपुरचे शिलेदार बना पूरस्कार

प्रथमोपचार अभावी कुणाचाही जीव जावू नये या करीता... केव्हाही, कुठेही, कुणाचाही रस्ते अपघात झाल्यास रस्ते अपघातग्रस्तांस त्वरीत मदत करा!

मानवी चुकीमुळे रस्ते अपघात होवुच नये याकरीता... वाहन नियमानेच चालवा!

दिनांक 3/11/17

प्रति,
मा. सहसंचालक
तंत्र शिक्षण मंडळ
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- अपघातमुक्त नागपूर बनविण्यासाठी जनजागृती करण्याकरीता शाळा व महाविद्यालयांचा सहभाग मिळण्याबाबत.

महोदय,

नागपूर शहराची विकासाची घौडदौड व SMART CITY कडे होणारी वाटचाल आपल्यासाठी अतिशय अभिमानची बाब आहे त्याचबरोबर मानवी चुकीमुळे होणारे अपघात व अपघातामुळे होणारे कौटुंबीक आघात ही अतिशय काळजीची व दु:खद बाब आहे.

वाहतुक नियमांचे पालण करण्यासाठी लोकजागृती व लोकसहभाग कसा होऊ शकतो लोकचळवळ उभे करण्याचे कार्य आम्ही हातात घेतले आहे. वाहतुक नियम पाळणे हे बंधनात्मक न राहता वाहतुक नियम पाळणे ही प्रत्योकाची जिवनपध्दती बनावी यासाठी आम्ही कार्य करीत आहोत.

२००१ पासुन या कार्याला सुरवात झाली आज पर्यंत ४००० च्या वर अपघातग्रस्तांना मदत केली आहे ३५० गंभीर अपघातग्रस्तांचे प्राण वाचविले आहे मानवी चुकींमुळे होणारे अपघात सरासरी ८५ टक्के असतात म्हणुन मानवी चुकींमुळे होणारे अपघात कसे कमी करता येतील किंबहुना ० टक्के व्हावे हे लक्ष ठेवुन लोकसहभागातुन याला समर्थ लोकचळवळीचे स्वरुप यावे यासाठी विविध क्षेत्रांतील नागरीकांपर्यंत आम्ही पोहचत आहोत.

आज अपघातग्रस्तांमध्ये जास्त प्रमाण युवकांचे आढळून येते किंवा युवक अपघाताला कारणीभूत असतात. या चळवळीचा एक भाग युवकांमध्ये जनजागृती करणे व त्यांना या मोहीमेत सामाउन घेण्यासाठी आम्ही शाळा व महाविद्यालयांमध्ये वेगवेगळे उपक्रम राबऊ इच्छीत आहोत त्यात निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वादविवाद स्पर्धा तसेच दर सोमवारी वाहतुक नियम पाळण्याची व त्यांचे पालन करण्याची शपत घेणे.

येत्या जानेवारी २०१८ मध्ये रस्ता सुरक्षा पंधरवाडयात यशवंत स्टेडीयम येथे कमीत कमी २५००० वेगवेगळया क्षेत्रातील नागरीक व शाळा महाविद्यालयातील युवकांना एकत्रीत करुन अपघात मुक्त नागपूर चा संकल्प करणे.

महोदय आपणास नम्र विनंती करीत आहोत की, आपल्या अधीपत्यातील शाळा व महाविद्यालयांना या चळवळीत सामील करण्यासाठी अनुमती द्यावी व परीपत्रक काढुन त्यांना भाग घेण्यास कळवावे.

सहसंचालक तंत्र शिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 7615
दिनांक 3 NOV 2017

महापौर
महानगर पालिका नागपूर.

3/11
परिपत्रक काढावे
3/11